महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

WWW.DAILYAWAZ.COM

संपादक : भगवान सोनवणे

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - १२ वे ■ अंक क्र. - २४४ ■ शुक्रवार दि.१७ एप्रिल २०२६ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४




# हयातीच्या दाखल्यासाठी सोसाव्या लागतात मरणयातना

## योजनांचा लाभ घेण्यासाठी वृध्दांची परवड

**दै. आवाज वृत्तसेवा...**

किशोर मोरे न्यायडोंगरी -

संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ वृद्धापकाळ पेन्शन योजना सुरू ठेवण्यासाठी लाभार्थींना आपण हयात असल्याचा दाखला देणे बंधनकारक असून, तो दाखला १ एप्रिल ते ३० जूनपर्यंत देणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांचा प्रत्यक्ष फोटो शासनाच्या पोर्टलवर अपलोड करावयाचा असल्याने स्वतःचा जिवंतपणा सिद्ध करण्यासाठी वृद्धांना तालुक्याच्या ठिकाणी कोणाचा तरी आधार घेत शिवाय बस किंवा खाजगी वाहतूक थांब्यापासून तर तहसील कार्यालया पर्यंत हातातील काठी टेकवत पायपीठ करत जावे लागत आहे परिणामी कडाक्याच्या उन्हात तहसील कार्यालयात तासनतास बसावे लागत आहे.







साधारण तालुक्यात जवळपास छोटी मोठी शंभर होऊन अधिक गावी आहेत तर काही गावातील वयोवृद्धांना २० ते २५ किलो मीटर अंतराचा अनेक अडचणीचा सामना करत प्रवास करावा लागत आहे.

नांदगाव तहसील कार्यालयात सध्या अशा प्रकारच्या वृद्धांनी गर्दी केल्याचे दिसत आहे. शासनाच्या संजय गांधी निराधार योजनेतून वयोवृद्धांना आर्थिक लाभदिला जातो.

यासाठी त्यांना दरवर्षी हयातीचा पुरावा द्यावा लागतो. वृद्ध लाभार्थी पायपीट करीत उन्हातान्हात कार्यालय गाठत आहे. कुणी आपल्या मुलांसोबत, तर कुणी नातवंडांबरोबर येऊन कार्यालयात पोहोचत आहेत.

कलमदरीच्या श्रीमती विठाबाई हिरामण राखोंडे वय साधारण ७० वर्षे या महिला कळमदरी येथे मुक्कामी असून, पहाटे पाच वाजेच्या एसटीने आपला नंबर लवकर लागावा यासाठी नांदगाव शहरात सकाळी सहा वाजताच उपस्थित होत्या, तर चंद्रभागा धोंडीराम सोनवणे या आजीला तर त्यांचा मुलगा आधार देत घेऊन येत होता.

लीलाबाई चंद्रभान पवार, रा. खिर्डी या काठीचा आधार घेत तहसील कार्यालयाच्या पायऱ्या चढत होत्या. तालुक्यातील विधवा, निराधार आणि श्रावणबाळ योजनेतील लाभार्थी संख्या साधारण १२४६७ असून, दोन्ही योजनेतील लाभार्थ्यांना दरमहा १५०० रुपये मानधन मिळत असते. सध्या उन्हाळा चालू असल्याने सकाळी उन्हाच्या अगोदर आपला नंबर कसा लागेल आणि आपले काम कसे लवकर होईल या अपेक्षेने हे वृद्ध महिला व पुरुष तहसील कार्यालयात एकच गर्दी करत आहेत.

ऐन उन्हाच्या भरात पाणी, जेवण आणि सावली या प्राथमिक गोष्टीची काळजी न करता होणारा त्रास सहन करत आजी व आजोबा आपले मानधन बंद होऊ नये म्हणून ही सर्व कसरत करत असून लाभापासून वंचित राहता कामा नये यासाठी खबरदारी घेत आहेत गावातच सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी लाभार्थी करीत आहेत शासन च्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

*****

लाभार्थी हयात असल्याचा दाखला हा शासनाच्या अधिकृत असलेल्या पोर्टलवर अपलोड होत असल्याने लाभार्थ्यांना प्रत्यक्ष हजर राहावे लागत आहे. मात्र, आम्ही सर्व लाभार्थ्यांची काळजी घेऊन काम करत आहोत.

**- योगेश पाटील, महसूल सहायक, नांदगाव तहसील**

प्रत्येक गावात (तहसील अंतर्गत)महसूल विभाग स्तरावर तलाठी नेमण्यात आले असून हे देखील शासनाचे च प्रतिनिधी आहेत त्यांना किंवा प्रत्येक ग्राम पंचायत ला अधिकृत डेटा ऑपरेटर असून त्यांच्या कडे सदर पोर्टल देऊन गावातच सदर सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी जेणेकरून वयोवृद्धांची हेळसांड थांबेल व योजने चा सुरळीत लाभ घेता येईल

**- किशोर मोरे जेष्ठ पत्रकार न्यायडोंगरी**


मी माझ्या गावातील मुक्कामी एसटीने सकाळी सहा वाजता नांदगावमध्ये आले असून, आमचा पूर्ण दिवस याच कामासाठी जात आहे. आता माझा नंबर केव्हा लागेल माहीत नाही. अशी व्यथा मांडली


- विठाबाई राखौंड, कळमदरी, लाभार्थी

## व्हायरल व्हिडिओचा फटका; जांबुटके ग्रामपंचायत अधिकारी निलंबित, आर्थिक गैरव्यवहारांचाही ठपका

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिंडोरी प्रतिनिधी - दिंडोरी तालुक्यातील जांबुटके येथील ग्रामपंचायत अधिकारी रविंद्र निवृत्ती चौधरी यांना शासकीय सेवेत शिस्तभंग, सोशल मीडियावरील आक्षेपार्ह वक्तव्य तसेच आर्थिक व्यवहाराच्या आरोपांवरून जिल्हा परिषद नाशिकने निलंबित केले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी १६ एप्रिल २०२६ रोजी हा आदेश जारी केला. आदेशानुसार, फेसबुकवर व्हायरल झालेल्या व्हिडिओत संबंधित अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत प्रशासन, सरपंच व जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांबाबत आक्षेपार्ह व अनुचित वक्तव्य केल्याचे समोर आले आहे. या व्हिडिओमुळे प्रशासनाची प्रतिमा मलिन होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच, ग्रामपंचायत स्तरावरील कामकाज करताना काही प्रकरणांमध्ये आर्थिक व्यवहार व पैशांच्या वाटाघाटी झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या सर्व बाबींची गंभीर दखल घेत प्राथमिक चौकशीत प्रथमदर्शनी आरोपांमध्ये तथ्य आढळल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा (पान २ वर)



# वेळापूर ते पिंपळगाव नजिकचा शिवार रस्ता चाळीस वर्षानंतर अखेर वाहतुकीसाठी खुला ; शेतकऱ्यांचा वनवास संपला

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लासलगाव, प्रतिनिधी – निफाड तालुक्यातील मौजे वेळापूर शिवारातील वेळापूर ते पिंपळगाव नजिक हा शिवार रस्ता गेल्या चाळीस वर्षांपासून बंद होता. मात्र, महसूल प्रशासनाच्या सकारात्मक पुढाकारामुळे हा रस्ता आता वाहतुकीसाठी कायमस्वरूपी खुला करण्यात आला असून, यामुळे स्थानिक शेतकऱ्यांनी मोठा सुटकेचा नि:श्वास सोडला आहे. गेल्या चार दशकांपासून हा रस्ता बंद असल्याने शेतकऱ्यांना शेतमाल वाहतूक व शेतीच्या कामांसाठी मोठी कसरत करावी लागत होती. रस्त्याअभावी मशागत व पीक बाजारात नेणे अत्यंत जिकिरीचे झाले होते. याबाबत शेतकऱ्यांनी निफाडचे तहसिलदार मा.विशाल नाईकवाडे यांचेकडे लेखी तक्रार केली होती. शेतकऱ्यांच्या या ज्वलंत समस्येची तहसीलदार नाईकवाडे यांनी गांभीर्याने दखल घेत भूमी अभिलेख कार्यालयास तातडीने रस्त्याची मोजणी करून महसूल कर्मचाऱ्यांना तो रस्ता कायमस्वरूपी खुला करण्याचे आदेश दिले होते. त्यांचे आदेशाने लासलगाव मंडळ अधिकारी रुपाली सावळे, ग्राम महसूल अधिकारी ईश्वरी




देशमुख यांच्या देखरेखीखाली रस्त्याची अधिकृत मोजणी पूर्ण करण्यात आली. याबाबत ग्रामस्थांना विश्वासात घेऊन पोलिस बंदोबस्तात या रस्त्यावरील सर्व अडथळे दूर करून तो सर्वसामान्यांसाठी खुला करण्यात आला. यावेळी मा.सरपंच नारायण पालवे, पोलिस उपनिरीक्षक किशोर पवार, पो.हवा नवनाथ नाईकवाडे, ग्रा.पं.अधिकारी नितीन शिरसाठ, विंचूर-चे वनरक्षक विजय दोंदे, वनसेवक जयप्रकाश शिरसाठ, महसूल सेवक जयश्री पवार यांच्यासह ग्रामपंचायत वेळापूर कर्मचारी उपस्थित होते. निफाडचे तहसिलदार व कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांचा हा चाळीस वर्षांपासूनचा ज्वलंत प्रश्न तातडीने मार्गी लावला, त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसा वाचणार असून शेती कामांना गती मिळणार आहे. त्यामुळे या ऐतिहासिक निर्णयाचे माणिक पालवे, राजू पालवे, निलेश पालवे, आबा पालवे, केदु गाडे, नारायण कुटे, शंकर कुटे, भाऊसाहेब घोडे, मधुकर सरोदे, कैलास सरोदे, सागर आढाव, साहेबराव वाकचौरे यांसह वेळापूर आणि पिंपळगाव नजिक क्षेत्रातील शेतकरी व खातेदार खातेदारांनी समाधान व्यक्त केले.

## नवोदय विद्यालय खेडगाव शंभर टक्के निकाल

**दै. आवाज वृत्तसेवा...**







शिक्षण मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत कार्यरत असलेल्या पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय, खेडगाव, जिल्हा नाशिक या विद्यालयाने शैक्षणिक सत्र २०२५-२६मध्ये इयत्ता १० वी सीबीएसई बोर्ड परीक्षेत आपल्या उत्कृष्ट १००% निकालाची परंपरा कायम ठेवली. या परीक्षेत सर्वेश भावसार या विद्यार्थ्याने ९७.८३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला, कल्याणी महाले हिने ९७.३३ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला तर सोहम फड या विद्यार्थ्याने ९७.१७ टक्के गुणासह तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. विषयवार गुणवत्तेचा विचार करता, मराठी विषयात ४५ विद्यार्थ्यांना, आयटी (खड) विषयात ०७ विद्यार्थ्यांना आणि विज्ञान विषयात ०१ विद्यार्थ्याला १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत. या उल्लेखनीय यशासाठी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे प्राचार्य एस. व्ही. स्वामी, उपप्राचार्य एल. वाय. बोऱ्हाडे, श्री बाळासाहेब चौधरी तसेच विषय शिक्षक श्री महेंद्रप्रताप सिंह, श्री पी. एम. वाघमारे, श्री पी. आर. घुले, श्री ज्ञानेश्वर दुवे, श्रीमती सविता पाठक, श्रीमती शुभांगी लोडम, श्री रोहिदास वाबळे आणि श्री परवेझ खान यांचे मार्गदर्शन लाभले.विद्यालयाच्या या उज्वल यशाबद्दल सर्व पीटीसी सदस्य यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले . अध्यापन व मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे तसेच विद्यार्थ्यांस विद्यालयीन सेवा प्रदान करणाऱ्या सहकारी सदस्यांचे अभिनंदन केले .

## हतगड येथे 'महसूल विशेष गांव भेट समाधान शिबीर' आणि 'महाराजस्व अभियान

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण पवार, हतगड.. नाशिक जिल्ह्यात प्रशासकीय कामाचा निपटारा करण्यासाठी आणि महसूल तक्रारीचे त्वरित निवारणासाठी गांव भेट समाधान शिबीर राबविले जात आहे. नाशिकचे जिल्हाधिकारी मा.आयुष प्रसाद यांच्या मार्गदर्शनाखाली प्रांतधिकारी अधिकारी कळवण मा.कश्मीरा शंखे यांनी या उपक्रमाची माहिती दिली आहे.कामगार आणि शेतकऱ्यांच्या सोयीसाठी शिबीरे संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत आयोजित केली जात आहेत. हे शिबीर महसूल विभागाशी संबंधित समस्यांवर लक्ष केंद्रित करते. ज्या मध्ये ग्रामस्थांच्या तक्रारीचे त्वरित निराकरण करणे. आणि शासकीय योजना थेट त्यांच्या दारी पोहचविणे.या उपक्रमामुळे



लोकांभिमुख प्रशासन थेट गावपातळीवर पोहचत असुन महसूल तक्रारीचे त्वरित निराकरण होण्यास मदत होते.त्या अनुषंगाने तहसील कार्यालय सुरगाणा आयोजित छत्रपती शिवाजी महाराज गांव भेट समाधान शिबीर महसूल मंडळ बोरगाव दि. १५ एप्रिल २०२६ रोजी हतगड येथे सायंकाळी ५.०० वा विशेष गांव भेट समाधान शिबीर आणि महाराजस्व अभियान राबविण्यात आले. या शिबिरामध्ये लोकांभिमुख प्रशासन महसूल विभागाचे अधिकारी थेट गावात भेट देऊन नागरिकांच्या समस्या ऐकल्या व समस्यांचे जागीच निराकरण करण्यावर भर दिला. व विविध दाखले,जाती, निवासी दाखले, आधारकार्ड, रोजगार सृजन,योजनाचे लाभ, तसेच ६ गावच्या ठिकाणी शिबीर घेणार आहेत. आपल्याला योजना माहित नसतांना म्हणून वंचित राहतो. रेशन कार्ड नवीन नाव टाकणे. असे नावे टाकून घेणार धान्य मोफत आहे. वृद्धपकाळ पैसे मिळतात का. Agristak नोंदणी करून घेणे...त्यामुळे योजना राबविण्यात येईल तो कार्ड नसेल तर योजना राबविण्यात येणार नाही. जमिनीवर वारस नोंद करून घेणे शेती वाटणी करून घ्या. सर्वांची समती असेल तर पानंद रस्ता केला जाईल अशी माहिती तहसीलदार रामजी राठोड यांनी दिली.त्यावेळी तहसीलदार रामजी राठोड, सर्कल सोनाली कोल्हे, तलाठी स्वप्नील पालवी,तलाठी प्रकाश कडली,भदाणे, लहांगे, बागुल डी. के. खोडे,हरीश गायकवाड, प्रकाश बागुल, रामदास गायकवाड, ग्रामस्थ रंगनाथ पवार, हिरा गावित, पुंडलिक पवार, पुंडलिक गांगुर्डे, सखाराम धुळे, लक्ष्मण राऊत, जगन पवार, उषा बाम्हणे, अनुसया पवार, गुंता धुळे,आरोग्य कर्मचारी, कृषी अधिकारी, व गावातील नागरिक उपस्थित होते.

***

## व्हायरल व्हिडिओचा फटका...

(पान १ वरून) सेवा (वर्तणूक) नियम १९६७ व महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील तरतुदीनुसार ही कारवाई करण्यात आली असून, संबंधित अधिकाऱ्यांचे वर्तन हे शासकीय सेवकाला अपेक्षित शिस्त व आचारसंहितेच्या विरोधात असल्याचे आदेशात नमूद आहे. तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणत्याही शासकीय कामकाजात हस्तक्षेप करू नये, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, दिंडोरी तालुक्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या काही संघटनांमुळे निर्माण झालेल्या तणावपूर्ण वातावरणाच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई झाल्याने तालुक्यात या निर्णयाचे स्वागत होत असल्याचे बोलले जात आहे. गेल्या काही काळापासून संघटनात्मक हस्तक्षेपामुळे प्रशासनातील वातावरण गढूळ झाल्याची चर्चा असून, या कारवाईमुळे शिस्त प्रस्थापित होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**वाढदिवस शुभेच्छा, जुने/नवे वाहन खरेदी/विक्री, घर/जमीन खरेदी विक्री, उद्घाटन सोहळा तसेच आपल्या फर्मची जाहिरात करा सवलतीच्या दरात**

**✲ संपर्क ✲ ९५४५९ १०१७७/८९९९९ २१९९४**

## 'देऊळ बंद २' च्या पोस्टरने जिंकली प्रेक्षकांची मने, चित्रपट खेचणार तुफान गर्दी?

**दै. आवाज वृत्तसेवा...**

बहुप्रतिक्षित देऊळ बंद २ च्या प्रदर्शनाची २१ मे २०२६ ही तारीख गेल्या आठवड्यात जाहीर करण्यात आली व त्यामुळे स्वामीभक्त आणि प्रेक्षकांमध्ये प्रचंड आनंदाचे वातावरण निर्माण झाले. आनंदाबरोबरच उत्सुकता वाढली असतानाच आज देऊळ बंद २ चे पहिले पोस्टर प्रदर्शित झाले आणि आनंदात अजूनच भर पडली. देऊळ बंद मध्ये ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांनी आपल्या सशक्त अभिनयाने आणि आवाजाने स्वामी समर्थ अक्षरशः प्रत्यक्षात आपल्या समोर उभे राहून आपल्याशी संवाद साधत आहेत असे प्रेक्षकांना वाटत होते. तेच सर्वांना देऊळ बंद २ मध्ये अनुभवायला मिळणार आहे, कारण या भागात सुद्धा




मोहन जोशी हेच श्री स्वामी समर्थांच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहेत तर महत्त्वपूर्ण भूमिकेत अभिनेत्री स्नेहल तरडे त्यांच्या सोबत असणार आहेत. वटवृक्ष एंटरटेनमेंट निर्मित देऊळ बंद २ - आता परीक्षा देवाची च्या पहिल्या पोस्टरमध्ये प्रसन्न मुद्रेने हात उंचावत स्वामी दुचाकीवर मागे बसले असून अभिनेत्री स्नेहल तरडे ती दुचाकी चालवत आहेत. स्वामी जरी प्रसन्न मुद्रेत असले तरी स्नेहल यांच्या चेहऱ्यावर राग आहे आणि डोळ्यातून अश्रू ओघळत आहेत, आता हा राग कशासाठी आणि दु:ख कशाचे? यासाठी प्रेक्षकांना चित्रपटाची वाट पाहायला लागणार आहे. 'भक्त कितीही संकटात असला तरी स्वामी त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे असतात', हाच संदेश या पोस्टरमधून अधोरेखित होत आहे. पहिल्या भागात स्वामींनी परदेशातून आलेल्या शास्त्रज्ञाच्या आलिशान चारचाकीतून प्रवास केला होता तर देऊळ बंद २ मध्ये स्वामी एका गरीब महिलेच्या सामान्य दुचाकीवरून प्रवास करताना दिसत आहेत. त्यामुळे प्रेक्षकांना या चित्रपटात स्वामीकृपेने एका सामान्य कुटुंबाची असामान्य गोष्ट पाहायला मिळणार असे दिसत आहे.

२१ मे २०२६ रोजी प्रदर्शित होणाऱ्या वटवृक्ष एंटरटेनमेंट निर्मित देऊळ बंद २ ची कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन अष्टपैलू कलाकार प्रविण विठ्ठल तरडे यांचे असून निर्मिती कैलाश वाणी, जयश्री कैलाश वाणी, कैवल्य वाणी आणि जुईली वाणी - सूर्यवंशी यांनी केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मताशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायक्षेत्र) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# नाशिक शिवसेना ठाकरे गटाचे गटनेते केशव पोरजे यांच्यासह तिघांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल

**दै.आवाज वृत्तसेवा...**

नाशिक रोड । प्रतिनिधी– नाशिक महानगरपालिकेतील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे गटनेते नगरसेवक केशव पोरजे यांच्यासह तिघांविरुद्ध उपनगर पोलीस ठाण्यात आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतजमीन शिल्लक नसतानाही तिचा व्यवहार करून एका निवृत्त व्यक्तीची आर्थिक फसवणूक केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला असून या घटनेमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

याप्रकरणी अनिलकुमार बारी यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. संशयित आरोपी केशव सिताराम पोरजे (रा. वडनेर दुमाला), गणेश बबन जाधव (रा. पिंपळगाव खांब) आणि विशाल शिवराज मालुंजकर (रा. वाडीवऱ्हे, इगतपुरी) यांनी संगनमत करून वडनेर गेट भागातील सर्व्हे नंबर २३९/१ मधील शेतजमिनीचा व्यवहार फिर्यादीसोबत केला होता. सदर ठिकाणी प्रत्यक्षात विक्रीसाठी जमीन शिल्लक नसतानाही, संशयितांनी फिर्यादीकडून वेळोवेळी पैसे घेऊन त्यांना २ आर क्षेत्र विकले आणि त्यांची फसवणूक केली. हा सर्व प्रकार सन २०१५ ते १५ एप्रिल २०२६ या कालावधीत घडला.

फिर्यादीच्या तक्रारीनंतर उपनगर पोलिसांनी गटनेते केशव पोरजे आणि इतर दोन संशयितांविरुद्ध गुन्हा अन्वये भारतीय न्याय संहिता कलम गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सपकाळे या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, जमिनीच्या व्यवहारातील या मोठ्या फसवणुकीमुळे नाशिक रोड परिसरात चर्चेला उधाण आले आहे.

# इच्छामणी मित्र मंडळाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी




**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक रोड : येथील जेलरोड, बेला डिसूजा रोड भागातील 'इच्छामणी मित्र मंडळा'च्या वतीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे औचित्य साधून नगर-सेवक प्रशांत दिवे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी परिसरातील नागरिक आणि कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. याप्रसंगी इच्छामणी मित्र मंडळाचे अध्यक्ष राजेश पाटील, उपाध्यक्ष राजेश जाधव, कार्याध्यक्ष हिरामण निकम, सचिव संजय निकम आणि खजिनदार राहुल महाले प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच वृत्तपत्र विक्रेते भारत माळवे, नोवेल भालेराव, नितीन चंद्रमोरे, समीर साळवे, संदीप साळवे, मधु साळवे, निलेश जाधव, सागर दाणी, भालचंद्र निकम, दीपक सांगळे यांच्यासह मंडळाचे सर्व सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला मंडळाच्या सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महामानवास अभिवादन केले. कार्यक्रमादरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करण्यात आला.

# सापूतारा इंटरनॅशनल स्कूलच्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर






**दै. आवाज वृत्तसेवा...**

सापुतारा प्रतिनिधी – सापुतारा इंटरनॅशनल स्कूलच्या (CBSE) दहावीच्या वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला असून, यावर्षी विद्यालयाचा एकूण निकाल अतिशय समाधानकारक लागला असून १००% विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातील विद्यार्थी कु. विराट संतोष लाडे यांनी – श्रेणीतून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच कुमार गामित आफताब अली आणि प्रणव पटेल यांनी इ श्रेणीतून यश संपादन केले आहे. तसेच इतर विद्यार्थ्यांनीही उत्तम यश संपादन केले आहे. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीमुळे हा उत्कृष्ट निकाल लागला आहे. शाळेचे व्यवस्थापन समितीतील शरदकुमार बारोट, महेंद्र कतारगामवाला, मधुसूदन कतारगामवाला व शाळेचे मुख्याध्यापक ईश्वर वाडेकर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे तसेच शिक्षकांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यात येईल असेही सांगितले.

# देवघट इंदिरानगर शाळेत आंबेडकर जयंती साजरी



**दै. आवाज वृत्तसेवा...**

कळवाडी– देवघट येथील जि. प. शाळा इंदिरानगर येथे शालेय कार्यक्रम परम, पूज्य महामानव, भारतीय घटनेचे शिल्पकार, ज्ञान, समता आणि स्वाभिमान यांचा प्रेरणादायी मंत्र देणाऱ्या महामानवला, विश्वरत्न डाँ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीसाजरी करण्यात आली त्या निमित्ताने प्रतिमा पूजन, पुष्पहार अर्पण करून विद्यार्थी भाषणे, शिक्षकांची भाषणे, संविधान गायन आदी कार्यक्रम घेण्यात आले.कलम का बादशहा यांच्या जयंती निमित्त देवघट गावाचे उपसरपंच श्री. चंदू निंबाजी सोनवणे यांनी जि. प. शाळा इंदिरानगर येथील सर्व आदिवासी विदयार्थीनां पेन, शॉपनर, इरेझर, पेन्सिल व बिस्कीटाचे मोफत वाटप केले.या प्रसंगी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य तसेच इंदिरानगर ग्रामस्थ तसेच शालेय शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# एलआयसी मनमाड शाखेत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**दै.आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी येथील भारतीय जीवन विमा निगम (एलआयसी) मनमाड शाखेत भारतरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि मानवतेचे महान पुरस्कर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती सोमवार दि.१३ अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमांच्या पूजनाने करण्यात आली. हे पूजन शाखाधिकारी विनायक भोसले, वरिष्ठ सहाय्यक प्रशासकीय अधिकारी महेंद्र पालवे तसेच देवराम शेळकांडे, संतोष घोरपडे, वर्षा तेली आणि जगनाथ पालवी यांच्या हस्ते पार पडले. यावेळी आपल्या मनोगतात शाखाधिकारी श्री. भोसले म्हणाले की, डॉ. आंबेडकर यांनी दिलेली बंधुता, समानता आणि शिक्षणाची शिकवण आजही समाजाला दिशा देणारी आहे. त्यांचे विचार हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून आजच्या पिढीसाठीही दीपस्तंभ आहेत. कार्यक्रमात विकास अधिकारी संजय दरोळे, रोहित पगारे आणि मनोज वाघ, सुनिल वाढवणे यांनी डॉ. आंबेडकर यांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी जीवनप्रवासावर प्रभावी मनोगते व्यक्त केली. याच प्रसंगी आगामी आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या विमा व्यवसायाचा शुभारंभ विमा प्रस्तावाचे पूजन करून करण्यात आला. हा शुभारंभ शाखाधिकारी श्री. भोसले यांच्या हस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमाला मनमाड शाखेतील हरीश सोनगत, रमेश मोरे, श्री. बगाडे, श्री. उखाडे, राकेश आहेर, बापू बागुल, हर्ष बोध तसेच ज्येष्ठ विमा प्रतिनिधी राजेंद्र माळी, सुबोध गायकवाड,अशोक पगारे,अजित संचेती, गंगाधर बिडगर, विमा सखी रुबीना खरे, अनिता भालेराव आदींची उपस्थिती लाभली.

# पिंपळगाव लेप शाळेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपकढोकळे, पिंपळगावलेप:प्रतिनिधी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १४ एप्रिल २०२६ मंगळवार रोजी सकाळी ८ वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त मान्यवरांनी प्रतिमा पुजन करून अभिवादन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेतील मुलींनी केले.तर शिक्षकांनी तसेच शाळेतील मुला-मुलींनी महामानव भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याबाबत सविस्तर माहिती देऊन आपले मनोगते व्यक्त केली.याप्रसंगी सरपंच/प्रशासक सुलोचना दौंडे,विनोद अहिरे,किरण गागरे,माणिकराव रसाळ,दिगंबर दौंडे,साहेबराव दौंडे,दिनकर दुनबळे,अतिश दुनबळे, राहुल पगारे,तसेच मुख्याध्यापक जालिंदर सोनवणे,संतोष गायकवाड,नईम मन्यार,भरत यादव,संजय वर्पे,सूर्यभान पैठणकर,बाबासाहेब गोरे,सुनील गीते,शितल सानप हे उपस्थित होते.

# शिवसेना पदाधिकाऱ्यावर कोयत्याने हल्ला

**दै. आवाज वृत्तसेवा...** नाशिक–: मागील जुन्या वादाच्या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटातील पदाधिकारी सुयश पाटील यांच्यावर कोयत्याने प्राणघातक हल्ला झाल्याची घटना मंगळवारी दि.१४ला रात्री साडेआठच्या सुमारास नविन नाशिक च्या सिडको दत्त चौक परिसरात घडली. सुयोग पाटील हे छत्रपती शिवाजी महाराज सेंट्रल पार्कच्या पाठीमागे असलेल्या त्यांच्या 'सप्तशृंगी टूर्स अँड ट्रॅव्हल्स' कार्यालयाच्या बाहेर बसले असतांना चार ते पाच जणांच्या टोळक्याने अचानक त्यांच्यावर पाठीमागून कोयत्याने वार केले. या हल्ल्यात पाटील गंभीर जखमी झाले असून, मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवत जखमी पाटील यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले.






# मार्च एण्डिंग, राहाता पालिका मालामाल, नागरिकांचे झाले हालेहाल ?

**दै. आवाज वृत्तसेवा ...**

नवनाथ सदाफळ, राहाता, वार्ताहर – सध्या मार्च एन्ड महिना असल्यामुळे, राहाता नगरपालिका ही खूप गजबजलेली दिसत आहे. घरपट्टी, पाणीपट्टी वसुलीचे जोरदार काम सुरु आहे. २०२५ ते २०२६ ह्या वर्षाची वसुली मार्च महिन्यात केली जात आहे. त्यात घरपट्टी व पाणीपट्टी वसुल केली जात आहे.ज्याच्याकडे पाणीपट्टी बाकी असल्यास, त्याचे नळ कनेकशन कट करण्यात येत आहे. घरपट्टी ज्याची बाकी त्याला नोटीस देत आहे. एवढ्या वरच पालिका थांबून राहील असे थोडी,चौकात ज्याचा कडे बाकी आहे, त्याचे नाव, बाकी बोर्ड वर लिहून, बोर्ड लावले. हे बाकी मस्त काम, बिना पैशाची जाहिरात माणूस पण हिट आणि पालिका पण फिट. नाहीतर आजच्या युगात कोण कुणासाठी चौकात बोर्ड, लावतो स्वतः:चे पैसे खर्चून.तरुणांच्या हाताला काम नाही. शिकून नौकरी नाही, इथं साधं वाढदिवस, सत्कार, अभिनंदन बोर्ड लावण्यासाठी वर्गणी गोळा करावी लागते. तुम्ही मात्र फुकटात जाहिरात केल्याबद्दल साहेब आपले हार्दिक अभिनंदन. साहेब जनतेच्या मनात येणारे अनेक प्रश्न, थोडक्यात साहेब तुम्ही पाणीपट्टी घेऊन जे पाणी देतात, ते पिण्यासाठी योग्य आहे का हो? गरिबा तील गरीब माणूस पिण्या साठी पाणी विकत घेताना दिसतोय हो साहेब. आपण त्यान्हा फिल्टर पाणी नाही देऊ शकत का साहेब? जसं तुम्ही बाकी थकीत झाल्यास बोर्ड वर नाव लिहता. तस पाणी पिण्यासाठी योग्य आहे का अयोग्य आहे, असे बोर्ड चौकात का नाही लावत हो साहेब? आपण दिलेल्या नळातील पाणी लोक बाथरूम, संडास, अंघोळ इतर वापरासाठी वापरतात हो साहेब? पिण्यासाठी का नाही, वापरत असे कधी विचारले का हो साहेब? (ह्यावर मार्ग काढा साहेब, मग च हक्काने नळ पट्टी मागा) दुसरा प्रश्न साहेब घरपट्टी चा, ज्याची मालकी हक्काची जागा व त्या जागेवर बांधलेली घर, त्यान्हा घरपट्टी. बरोबर ना साहेब, यात काहीही दुमत नाही. पण त्या हक्काच्या घरात कामावणारा मुलगा नाही हो. नौकरी नसल्या मुळे कोणी आत्महत्या केली, तर कोणी कामासाठी गाव सोडून गेले, शिकून कामधंदा नसल्यामुळे, अनेक तरुण व्यसना आहारी गेले. त्या जुन्या घरात आजी किव्हा आजोबा आजारी पडलेले पलंगावर दिसतात. त्यांच्याकडे दवाखान्यात जाण्याचा खरंच सुद्धा नसतो वो साहेब. कारण राहत्यातील सरकारी दवाखाना असून अडचण, नसून खोलंबा. असा झाला आहे. तिथं तर रुग्ण ऍडमिट करूनच घेत नाही, दिवसा दवाखान्यात झोपवतात,रात्री घरी काढून देतात,ते जाऊदे साहेब आपण मुद्याचं बोलू. अशी जर अवस्था असेल तर ते गरीब घरपट्टी कशी भरेल हो साहेब,? आणि तुम्ही त्यान्हा नोटीसा पाठवतात. बर ते जाऊद्या साहेब? जो प्रत्येक वर्षी क्लिअर पट्टी भरतो, त्याला तुम्ही कोणत्या सुविधा दिल्या हो साहेब. घरासमोर असलेला रस्ता फुटलेला, गटार आहे तर चेम्बर नाही, चेम्बर आहे तर त्यावर झाकण नाही. वर्ष्यातून कधी तरी डास फवारणी होते, त्यात औषधंचे प्रमाण म्हणजे एक मासा,तवली भर रस्सा (जे समजायचे तुम्ही ते समजावून घ्या).माननीय नागराधक्ष तुम्ही जनतेच्या मनातील नगरध्यक्ष आहे. जनतेने तुम्हाला खुप अपेक्षेने निवडून दिलेले आहे. तुमची टीम म्हणजे सर्व नगरसेवक हे सुद्धा जनतेच्या मनातील आहे, जनतेने ह्या निवड णुकीत काळे, पांढरे खडे बरोबर वेगळे करून टाकले आहे. योग्य ते उमेदवार निवडून दिले. जनतेचा डॉक्टर सुजय दादा विखे पाटील, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, नागराधक्ष डॉक्टर स्वाधीन गाडेकर, व तुमची सर्व नगरसेवक टीम, पूर्ण पणे जनतेचा विश्वास तुमच्या सर्वावर आहे. तुम्ही जनतेचे प्रश्न मार्गी लावू शकता आणि समस्या सोडू शकता. कारण जनतेने तुम्हाला तुमचा चेहरा बघून नाही तर, विखे पाटील यांचे विकास कामे बघून निवडून दिले आहे. कारण विखे पाटील म्हणजे विकास कामे होणारच. जर एखाद्याला वाटत असेल का, मि निवडून आलो, त्याच्या मनातला भ्रम काढून टाकावा. कारण फुग्यात भरलेली हवा जो पर्यंत असते, तो पर्यंत तो उडत असतो. नंतर हवा संपली का तो पुन्हा जमिनीवर आदळतो. शेवटी जनता जनार्दन? माननीय नगर अध्यक्ष, मुख्याधिकारी, सर्व नगरसेवक,, कोणता कर कश्यासाठी असतो, हे पालिका कर्मचारी यान्हा समजवून सांगावे, कारण त्यान्हा विचारले असता कोणता कर कश्यासाठी तर ते एकच उत्तर देतात, सर्व शासनाचा आहे.

## दोन शेतकऱ्यांचा विजेचा शॉक लागून मृत्यू

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव प्रतिनिधी – तालुक्यातील साकोरा परिसरात आजचा दिवस अत्यंत वेदनादायी ठरला असून, दोन कष्टाळू तरुण शेतकऱ्यांचा विजेचा शॉक लागून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडल्याने साकोरा गावावर शोककळा पसरली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, पांझण नदीपात्रात गेल्या काही वर्षांपासून पन्नास ते साठ शेतकऱ्यांचे विजपंप कार्यरत आहेत. आज (गुरुवारी) सकाळी अकरा ते बारा वाजेदरम्यान साकोरा येथील शिरीष भगवान पठाडे(४२) व जगदिश तुकाराम खैरनार (३६) हे दोघे तरूण शेतकरी पांझण नदीवर वीज पंप सुरू करण्यासाठी गेले. मात्र, वीज पंप पाण्याबाहेर असल्याने तो पाण्यात खेचण्याच्या प्रयत्नात पाण्यात अचानक वीज पुरवठा सुरू झाल्याने दोन्ही शेतकर्यांना विजेचा तीव्र झटका बसला. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला.या घटनेची माहिती गावात समजताच संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

**नशीबाचा क्रूर खेळ** – या दुर्घटनेतील धक्कादायक आणि मनाला चटका लावणारी बाब म्हणजे जगदीश खैरनार यांचा भूतकाळ होय. वीस वर्षांपूर्वी जगदीश खैरनार यांच्या घरावर वीज कोसळल्याने लागलेल्या भीषण आगीत एकाचवेळी घरातील सहा जणांचा मृत्यू झाला होता. यापैकी खैरनार पिता-पुत्र यांचा मृत्यूशी झुंज देताना जीव वाचला होता. मात्र, आज पुन्हा काळाने जगदीशवर झडप घातली आणि यावेळी त्यांना सावरण्याची संधीही मिळाली नाही. तसेच काही महिन्यांपूर्वी शिरीष पठाडे यांच्या मोठ्या बंधुचे आकस्मिक निधन झाले होते. तरी देखील ते दुःख विसरून रविवार (दि.२६) रोजी मुलीचे लग्न असल्याने घरात सध्या आनंदाचे वातावरण होते. घरामध्ये लग्नाची जय्यत तयारी सुरू असताना अचानक वडीलांचे छत्र हरपल्याने पठाडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. सदर घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी व पोलिसांनी पांझण नदीकाठी धाव घेऊन पंचनामा करून दोघांचेही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी नांदगाव ग्रामीण रूग्णालयात पाठवण्यात आले आहेत.

## तालुका तळा येथील संयुक्त जयंती सोहळा विविध सामाजिक उपक्रमाने मोठ्या जल्लोषात साजरा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

बोरघर / माणगांव ( विश्वास गायकवाड ) बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा तळा व उपशाखा तसेच दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सर्व महापुरुषांचा संयुक्त जयंती सोहळा रामदास राघो शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात व जल्लोषात साजरा करण्यात आला.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे बौद्धजन पंचायत समिती तालुका तळा अध्यक्ष अनंत गोपाळ मोरे व गणपत जगताप यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर महामानवांच्या प्रतिमांचे पुष्पपूजन करून संस्कार प्रमुख नरेश मोरे, विशाखा शिंदे व शालिनी माळी यांनी धम्मवंदना व सूत्रपठण केले.

समता सैनिक दलाचे संरक्षण प्रमुख मनोहर शिंदे, वैशाली नाक्ते,यश जसवलकर, प्रथमेश शिंदे, रितिका मोरे, अनिषा जगताप तसेच समस्त बाल सैनिक, पुरुष सैनिक व महिला सैनिक यांनी जयभीमच्या जयघोषात महापुरुषांना मानवंदना अर्पण केली.

या जयंती सोहळ्यास महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच प्रबोधनकार मनोज महाले (प्रदेशाध्यक्ष, छत्रपती क्रांतिसेना महाराष्ट्र राज्य) यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास ऍड. उत्तम जाधव, राजिप सदस्य गीता जाधव, ऍड. सुशांत जगताप, ऍड. प्रबुद्ध माळी, रायगड जिल्ह्यातील प्रख्यात मराठी उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरे माणगाव, ऍड. संघराज गायकवाड, प्राचार्य सचिन बंगाले, आदित्य शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांचा स्वागत समारंभ भारतीय बौद्ध महासभा महिला अध्यक्षा सुषमा शिंदे व बौद्धजन पंचायत समिती महिला अध्यक्षा सरिता तांबे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संदेश पवार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सचिन गवाणे व पत्रकार सुरेंद्र शेलार यांनी केले, तर आभार प्रदर्शन एन. के. जगताप व विठ्ठल जगताप यांनी केले.या जयंती सोहळ्यासाठी भोजनदान किशोर शिंदे यांनी, पाणीदान सुमन सकपाळ यांनी तर गोड पदार्थ (लाडू) वाटप प्रफुल्ल तांबे यांनी केले. यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते तळा नगरपंचायत पर्यंत भव्यदिव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत लहान थोरांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत डीजेच्या तालावर ठेका धरला.

## लासलगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर; नागरिकांसाठी महसूल सेवा एका छताखाली

**दै.आवाज वृत्तसेवा...**

लासलगाव : लासलगाव येथे महसूल विभागामार्फत 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान' अंतर्गत नागरिकांना तात्काळ सेवा देण्याच्या उद्देशाने शुक्रवार दि. १७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता ग्रामपंचायत कार्यालय प्रांगण, लासलगाव येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन निफाडचे तहसिलदार मा.विशाल नाईकवाडे, लासलगाव मंडळ अधिकारी रूपाली सावळे यांनी केले आहे.

या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मंत्री छगनराव भुजबळ, खासदार भास्करराव भगरे, आ.नरेंद्रजी दराडे, आ.किशोरजी दराडे, नाफेडचे माजी संचालक नानासाहेब पाटील, बाजार समिती सभापती ज्ञानेश्वर जगताप, माजी आमदार कल्याणराव पाटील तसेच मुंबई बाजार समिती संचालक जयदत्त होळकर उपस्थित राहणार आहेत. शिबिरासाठी मार्गदर्शक म्हणून उपविभागीय अधिकारी डॉ.शशिकांत मंगरुळे (निफाड) हे उपस्थित राहणार असून लासलगाव महसूल मंडळातील ग्राम महसूल अधिकारी प्रियांका वाघ (लासलगाव), लक्ष्मीकांत शिंदे (टाकळी विंचुर), जनार्दन उशीर (खडकमाळेगाव), ईश्वरी देशमुख (पिंपळगाव नजिक) व सुप्रिया माळोदे (वनसगाव) यांच्यासह मंडळातील सर्व सरपंच, पोलिस पाटील, ग्रामपंचायत अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, बी.एल.ओ. अधिकारी, महसूल सेवक, रेशन दुकानदार तसेच सेतु कार्यालयांचे प्रतिनिधी उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या सोडविणार आहेत. त्यामुळे लासलगाव मंडळातील टाकळी विंचुर, कोटमगाव, खडक माळेगाव, सारोळे खुर्द, खानगाव नजिक, पिंपळगाव नजिक, वेळापुर, वनसगाव, ब्राह्मणगाव वनस, थेटाळे, निमगाव वाकडा, पाचोरे बु., पाचोरे खुर्द, ब्राह्मणगाव विंचुर, शिवापुर आदी गावांतील नागरिकांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन महसूल विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

या उपक्रमामुळे महसूल विभागाच्या विविध योजनांबाबत जनजागृती होऊन नागरिकांना जलद व प्रभावी सेवा मिळण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे

* या शिबिरात महसूल विभागामार्फत शासन निर्णयानुसार भोगवटादार वर्ग २ मधून वर्ग १ करण्यात आलेल्या जमिनींचे दुरुस्त सातबारा वाटप, जिवंत सातबारा मोहिमेअंतर्गत नोंदी घेणे, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजुरी, विद्यार्थ्यांना आवश्यक दाखले वितरण, सर्वांसाठी घर योजनेअंतर्गत पट्टे वाटप, अभिलेख दुरुस्ती हेल्पडेस्क, सातबारा वरील चुका दुरुस्ती व तात्काळ सुधारित सातबारा वितरण, तुकडेबंदी कायद्यांचे उल्लंघन करून झालेल्या अकृषिक हस्तांतरणाच्या नोंदी, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत मान्यता आदेश वितरण, सातबारा वरील वर्ग १ पोटखराबा क्षेत्राचे लागवडीयोग्य क्षेत्रात रूपांतर, प्रलंबित फेरफारांची निर्गती, लोकसेवा हक्क कायद्याअंतर्गत प्रमाणपत्रांचे तात्काळ वितरण, ई-मोजणी, ग्रीस्टॅक व पी.एम किसान तक्रार निवारण यांसारख्या सेवा देखील देण्यात येणार आहेत.

****

